# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक ०६.१०.२४ (रविवार)

..........................................................................................................................................

**पोलीस ठाणे अरोली अवैधरित्या रेती चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा नोद.**

दि. ०४/१०/२०२४ रोजी रात्री मा. उप विभागीय पोलीस अधिकारी रामटेक यांचा आदेशाने रामटेक विभागात अवैध धंद्यावर रेड कार्यवाही करने कामी रवाानगी टाकुन पेट्रोलिंग करित असता मुखबीर व्दारे खबर मीळाली की घोटी टोक ते अरोली मार्गे टीप्पर ट्रक क्र. एम एच ४९ सी. एफ २७२७ हा अवैध रेती वाहतूक करून नेत आहे. टिप्परची ची पाहणी केली असता चालक नामे सुरेश जंतू लहरे वय ३६ वर्ष रा. घर क्र १६१ अन्नपूर्णा सोसायटी भंडारा रोड नवीननगर पार्डी नागपूर यांना परवाना विचारले असता त्याने त्याचा जवळील ओपो कंपनीचा मोबाईल मध्ये एक ब्रास रॉयल्टी असल्याचे फोटो दाखवीले त्या टीप्पर मध्ये १ ब्रास रेती पेक्षा जास्त रेती असल्याचे संशय आल्याने रेतीचे वजन काटा केले असता त्यामध्ये अंदाजे ७ ब्रास रेती जास्त भरून असल्याचे आढळल्याने

१) टिप्पर ट्रक क्र. एम एच ४९ सी. एफ २७२७ अंदाजे ३,५०,००००/ व ७ ब्रास रेती कि. २१,०००/– व चालकाचा विवो कंपनीचा ॲनरॉईड मोबाईल कि. १०,०००/– रूपये. असा एकुन ३५,३१,०००/– रूपयाचा मुद्देमाल घटनास्थळा वरून पंचासमक्ष ताब्यात घेवून जप्त करण्यात आला व पोलीस स्टेशन अरोली येथे वरिल टिप्पर चालक सुरेश जंतू लहरे वय ३६ वर्ष रा. घर क्र १६१ अन्नपूरणा सोसायटी भंडारा रोड नवीननगर पार्डी नागपूर यांच्या विरूध्द विविध कलमान्वये गुन्हा दाखल करून अटक करण्यात आली आहे.

सदरची कार्यवाही मा. श्री हर्ष पोद्दार (भा.पो.से.) पोलीस अधीक्षक, नागपूर जिल्हा, (ग्रामीण), मा. श्री रमेश धुमाळ, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर जिल्हा, (ग्रामीण), मा. श्री रमेश बरकते, उपविभागीय पोलीस अधिकारी, रामटेक विभाग, यांच्या मार्गदर्शनाखाली श्री स्नेहल राऊत, स.पो.नि. ठाणेदार, पोलीस स्टेशन अरोली व स्टॉप यांनी केली.

# देवलापार पोलीसांनी अवैध्य गोवंश वाहतुक करणारी वरना कार पकडुन ४ गोवंश यांना दिले जिवनदान

दिनांक ०५/१०/२०२४ रोजी पोलीस ठाणे देवलापार येथील पोलीस अधिकारी सपोनी /नारायण तुरकुंडे पोहवा १९७३,पोशी २३३९,१४६ पो.स्टे.देवलापार हे पोलीस स्टेशन हददीत स्टाफसह पेट्रोलींग करीत असतांना गोपनीय माहिती मिळाली की,जबलपुर कडुन नागपुर कडे देवलापार मार्गे वेळ ०९/३० ते १०/०० वा एका सिल्वर रंगाच्या वरणा कार अवैध्यत्यिा जनावर वाहतुक करून खवासा दिशेने देवलापार कडे येत आहे अशा माहिती वरून मोरफाटा समोर नाकाबंदी लावली असता सदर वाहन नाकाबंदी करून थांबवले असता सदरचे वाहन हे ३०० मिटर अगोदरच थांबवुन आरोपी पडुन गेला सदर वाहनाची खबरी ने सांगीतलेल्या माहिती प्रमाणे वरना कार क्रं.एमएच ०२ बीजी २२३१ वरणा वाहणाची पंचासमक्ष तपासणी केली असता कार मध्ये आखुड दोरखंडाने गोवंशाचे तोंड ,मान ,पाय अत्यंत क्रूरतेनें व निर्दयतेने बांधलेले एकुन ४ जनावरे किंमत ४५,०००/ रू व वाहन कार क्रं.एमएच ०२ बीजी २२३१ किंमत ३,५०,०००/रू असा एकुन ३,९५,०००/रू चा मुददेमाल पंचासमक्ष जप्त करून जनावरांची योग्यरित्या चारापानी व देखभाल होणे करीता सदरची जनावरे गो शाळा देवलापार येथे दाखल करण्यात आले वरणा कार क्रं.एमएच ०२ बीजी २२३१ च्या फरार चालका विरूदध अवैध्यरित्या जनावरांची वाहतुक केल्याने नमुद आरोपीतांनविरूदध कलम २८१,३२५ भा.न्या.स.सहकलम ११(१)प्राण्यांचा छळ प्रतिबंध अधिनियम सहकलम ५(अ),९ महा,प्राणी सरक्षण अधिनियम सहकलम ११९ मपोका अन्वये गुन्हा नोंद करून तपासावर आहे,

सदरची कार्यवाही मा. श्री हर्ष पोद्दार (भा.पो.से.) पोलीस अधीक्षक, नागपूर जिल्हा, (ग्रामीण), मा. श्री रमेश धुमाळ, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर जिल्हा, (ग्रामीण), मा. श्री रमेश बरकते, उपविभागीय पोलीस अधिकारी, रामटेक विभाग, यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनी /नारायण तुरकुंडे व त्यांचे स्टाफ नी पार पाडली.

## जुगार खेळणाऱ्या १३ आरोपीतांवर गुन्हा नोंद नागपूर ग्रामीण अरोली पोलिसांची कारवाई

पोलीस स्टेशन अरोली दिनांक ०५/१०/२०२४ रोजी १७.०० वाजता दरम्यान पोस्टे परिसरात पेट्रोलिंग करीत असताना गुप्त माहितीदाराकडून मिळालेल्या माहितीवरून मौजा खात शेत शिवारात कैलास गिरीपुंजे यांच्या शेताजवळ एका पांधण रस्त्यावर काही ईसम ५२ तास पत्त्यावर पैशाची बाजी लावून हार जितचा जुगार खेळत आहे अशा मिळालेल्या माहितीच्या आधारे सपोनी राऊत यांचे मार्गदर्शनात सापळा रचून कारवाई केली असता एकूण १३ आरोपी नामे १) दिनेश वामन गायकवाड़ वय ३४ वर्ष रा. वाकेष्वर ता. मौदा जि.नागपुर २) हंसराज आखाडु लोढेकर वय ३६ वर्ष रा दहेगाव ता मौदा जि.नागपुर ३) राहुल बंडुजी सेलोकर वय ३४ वर्ष रा. आदासा ता, मौदा जि.नागपुर ४) शुभम लक्ष्मण पाठक वय २६ वर्ष रा. तांडा ता. मौदा जि.नागपुर ५) आषिक ढेमन तांडेकर वय ३० वर्ष रा. तांडा ता. मौदा जि.नागपुर ६) उमेष मारोती बांते वय ३४ वर्ष रा.आदासा ता. मौदा जि. नागपुर ७) रणविर तुळषिराम माने वय ४८ वर्ष रा. हत्तीड़ोही ता. भंडारा जि. भंडारा ८) भगवान श्रीराम बन्सोड वय ४९ वर्ष रा. नेरी ता. मोहाडी जि.भंडारा ९) प्रविण वामन भोयर वय ३० वर्श रा. ढोलमारा ता. मौदा जि. नागपूर १०) राजेशकुमार सुचेद्रप्रसाद सिंग वय ४५ वर्ष ॅ रा. शास्त्री वार्ड वरठी ता. मोहाडी जि.भंडारा ११) राजकुमार सिताराम रोढे वय ४४ वर्ष रा. वरठी ता. मोहाडी जि.भंडारा १२) ज्ञानेष्वर महागु गिरीपुंजे वय ५२ रा. खात ता.मौदा जि.नागपुर १३) टोमेश्वर उर्फ टोम्या धनपाल भुते वय ३५ वर्ष रा. सिरसोली ता.मौदा जि. नागपूर यांचे आरोपीतांच्या अंगझडती तुन नगदी रूपये २६,६५०, ११ नग मोबाईल ९०,७००, तसेच ८ मोटार सायकल ४,७५,००० असा एकुण ५,९१,९९०/—रूपये माल जप्त करून मु.जु.का.कलम १२ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. पुढील तपास अरोली पोलीस करत आहेत.

सदरची कार्यवाही मा. श्री हर्ष पोद्दार (भा.पो.से.) पोलीस अधीक्षक, नागपूर जिल्हा, (ग्रामीण), मा. श्री रमेश धुमाळ, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर जिल्हा, (ग्रामीण), मा. श्री रमेश बरकते, उपविभागीय पोलीस अधिकारी, रामटेक विभाग, यांच्या मार्गदर्शनाखाली श्री स्नेहल राऊत, स.पो.नि. ठाणेदार, पोउपनि सुशिलकुमार सोनवने, पोशि कृष्णा नागोसे, पोशि लक्ष्मिकांत मुदनर, मनिष सुखेदवे पोलीस स्टेशन अरोली यांनी केली.

## अपघात भरधाव टिप्परेने ९ जनावरे चिरडली टिप्पर चालकावर उमरेड पोलिसांची कारवाई

पो.स्टे. उमरेड – दिनांक ०६/१०/२०२४ चे घटना वेळ ९.३० ते ९.४५ वा. दरम्यान, बेसुर ते उमरेड जाणा–या, बेसुर शिवार, यातील फिर्यादी नामे – झितरू किसन नेवारे वय ५५ वर्ष रा बेसुर ता भिवापूर यांनी पोलीस स्टेशन ला येवून टिप्पर क्रमांक एमएच ४० सीडी ५८४२ चे चालक नामे ओमकारसिंह बिन्स याने त्याचे ताब्यातील वाहनाने भरघाव वेगाने व निष्काळजीपणे चालवून फिर्यादी चे जनावरांना धडक दिल्याने ८ गायी व १ नवजात वासरू मयत झाले असुन १ बैल, १ गाय विकलांग करून एकुण १,२०,०००/– रूपयाचे नुकसान केले. अशा फिर्यादी चे रिपोर्ट वरून आरोपी विरूध्द कलम ३२५ भारतीय न्याय संहिता अन्वये गुन्हा नोंद केला पुढील तपास पोलीस स्टेशन उमरेड करित आहे.

पोलीस माहीती कक्ष
नागपुर ग्रामीण जिल्हा नागपुर